**पाहिजेत**

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**व्यवसाय**

आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?

आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामांकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!

निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही

संपर्क : 8087459854



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २६७ वा | बुधवार, दि. ०३ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# ...तर मुख्यमंत्र्यांना आषाढीला पंढरपुरात पाऊल ठेवू देणार नाही

## शेतकऱ्यांच्या थेट इशारा, शक्तीपीठ महामार्गाविरोधात माढ्यात विराट मोर्चा

**माढा (कटूसत्य वृत्त):-** राज्यात प्रस्तावित असलेल्या शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या असंतोषाचा मोठा भडका उडाला आहे. माढा आणि पंढरपूर तालुक्यात या महामार्गाविरोधात जोरदार आंदोलनाला सुरुवात झाली आहे. माढ्यात आज या विरोधात शेतकऱ्यांनी विराट मोर्चा काढला, तर पंढरपूर तालुक्यातील करकंब येथे जमिनीची मोजणी करण्यासाठी आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना




शेतकऱ्यांच्या तीव्र रोषाला सामोरे जावे लागले. "शेतकऱ्यांच्या विरोधाला न जुमानता बळाचा वापर करून जर महामार्ग लादण्याचा प्रयत्न केला, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आषाढी एकादशीला पंढरपुरात पाऊल ठेवू देणार नाही आणि महापूजेपासून रोखू," असा थेट आणि गंभीर इशारा शेतकरी नेत्यांनी दिला आहे.

**द्राक्षबागा आणि फळपिके उद्ध्वस्त करू नका**

आज माढा येथील स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि इतर शेतकरी संघटनांच्या वतीने माढा तहसील कार्यालयावर शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात घोषणाबाजी करत भव्य मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व करणारे शेतकरी नेते संजय पाटील घाटणेकर यांनी शासनाला खडेबोल सुनावले. आमच्या द्राक्षबागा आणि फळपिके उध्वस्त करून जर शक्तीपीठ महामार्ग केला तर त्याला टोकाचा विरोध केला जाईल, असा इशारा संजय पाटील घाटणेकर यांनी दिला आहे. तसेच, आगामी आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेला मुख्यमंत्र्यांना पंढरपूरमध्ये पाय ठेवू न देण्याचा इशाराही त्यांनी दिला.

**करकंबमध्ये अधिकारी आणि पोलीस फौजफाटा रोखला**

दुसरीकडे, आजच पंढरपूर तालुक्यातील करकंब येथे शक्तीपीठ महामार्गाच्या भू-संपादनासाठी मोजणी करण्यासाठी सरकारी अधिकारी आणि मोठा पोलीस बंदोबस्त दाखल झाला होता. मात्र, मोजणीची कुणकुण लागताच शेतकरी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. शेतकऱ्यांनी सरकारी अधिकारी आणि पोलीस फौजफाट्याला वेढा घालत जोरदार घोषणाबाजी केली. शेतकऱ्यांचा वाढता रोष पाहून प्रशासकीय अधिकाऱ्यांना अखेर मोजणी न करताच माघारी फिरावे लागले.

**मार्ग बदलूनही विरोध कायम**

यापूर्वी, नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाला पश्चिम महाराष्ट्रातून मोठा विरोध झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महामागार्चा मार्ग बदलण्याचे संकेत दिले होते. मात्र, तरीही नवीन रचनेत ज्या गावांमधून हा मार्ग जात आहे, तिथे शासन आणि प्रशासनाला शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधाचा सामना करावा लागत आहे. आता आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या या आक्रमक पवित्र्यामुळे राज्य सरकारची कोंडी होण्याची शक्यता आहे. आता या आंदोलनावर पडदा टाकण्यासाठी आणि शेतकऱ्यांचा रोष शांत करण्यासाठी सरकार शक्तीपीठ महामागार्बाबत काय मोठा निर्णय घेणार ? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## काँग्रेसला धक्का, अधिकृत उमेदवाराचा अर्ज बाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीच्या विधानपरिषद निवडणुकीमुळे राज्यात राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. जो-तो पक्ष आपापल्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी प्रयत्न करत आहे.



उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ही 4 जून असल्याने बंडखोरांची मनधरणी करण्याच्या दिव्याला त्या-त्या पक्षाचे प्रमुख तोंड देत आहेत. महायुतीप्रमाणेच महाविकास आघाडीतही अनेक ठिकाणी काही नेत्यांनी पक्षादेश झुगारून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या निवडणुकीत महायुतीचे पारडे जड भरण्याची शक्यता असली तरीही महाविकास आघाडीनेदेखील या निवडणुकीसाठी पूर्ण जोर लावला आहे. यावेळी काँग्रेसने आपल्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी पूर्ण ताकद लावली आहे. परंतु उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख जवळ आलेली असतानाच आता काँग्रेसला सोलापुरात जबर धक्का बसला आहे. येथे काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराचा अर्जच थेट बाद झाला आहे.

**नेमकं काय घडलं ?**

हाती आलेल्या ताज्या माहितीनुसार सोलापूर विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी सज्ज असलेल्या काँग्रेसच्या उमेदवाराचा अर्जच बाद झाला आहे. येथे काँग्रेसने आदित्य फत्तेपूरकर यांना उमेदवारी दिली होती. परंतु त्यांचा उमेदवारी अर्ज आता बाद झाला आहे. काँग्रेसचे सूचक नागेश भोसले यांची सही बोगस असल्याचे अर्ज पडताळणीत स्पष्ट झाले. त्यामुळेच फत्तेपूरकर यांचा अर्ज बाद करण्यात आला आहे.

**नागेश भोसले यांनी दिले स्वयंघोषणापत्र**

मी कोणत्याही पक्षाचा कार्यकर्ता नसून मी फत्तेपूरकर यांच्या उमेदवारी अर्जावर सही केलेली नाही, असे नगरसेवक नागेश भोसले यांनी स्वयंघोषणापत्रात म्हटलेले आहे. हे स्वयंघोषणापत्र निवडणूक अधिकाऱ्यांना दिल्यामुळे त्याचाच आधार घेत आता काँग्रेसच्या उमेदवाराचा उमेदवारी अर्ज बाद ठरवण्यात आला आहे.

**10 पैकी 9 सूचक राहिले**

नागेश भोसले यांनी सही माझी नसल्याचे स्वयंघोषणापत्र दिल्याने काँग्रेस उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांना 10 पैकी केवळ 9 सूचक राहिले. त्यामुळेच त्यांचा उमेदवारी अर्ज रद्दबातल ठरवण्यात आला. दरम्यान, फत्तेपूरकर यांचा उमेदवारी अर्ज बाद झाल्यानंतर काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले आहेत. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर जोरदार घोषणाबाजी केली आहे. त्यामुळे सध्या तेथे काही काळी तणावाची स्थिती निर्माण झाली. दरम्यान, आता काँग्रेसच्या उमेदवाराचा उमेदवारी अर्जच बाद झाल्याने पुढे काय होणार ? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## बँकांच्या गैरप्रकारांविरोधात भारतीय मित्र समूहाचे गुरुवारी ठिय्या आंदोलन

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** बँकांमधील ग्राहकांना होणारा त्रास, वाढते गैरप्रकार, अपुरी ग्राहक सेवा आणि बँकिंग व्यवस्थेतील विविध त्रुटींविरोधात जनजागृती करण्यासाठी भारतीय मित्र समूहाच्या वतीने ४ जून २०२६ रोजी एकदिवसीय ठिय्या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून शासन, प्रशासन तसेच संबंधित बँक अधिकाऱ्यांचे लक्ष ग्राहकांच्या गंभीर समस्यांकडे वेधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.



भारतीय मित्र समूहाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बँकांचे ग्राहक आणि गुंतवणूकदार म्हणून अनेक नागरिकांना विविध प्रकारच्या अडचणी, मानसिक त्रास तसेच बँकांमधील गैरप्रकारांचा सामना करावा लागत आहे. ग्राहकांना सन्मानपूर्वक आणि पारदर्शक सेवा मिळावी, बँकिंग व्यवहार अधिक सुलभ व्हावेत आणि आर्थिक क्षेत्रातील गैरप्रकारांना आळा बसावा, यासाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.

**बँकिंग व्यवस्था सुधारण्यासाठी १५ प्रमुख मागण्या**

आंदोलनकर्त्यांनी बँकिंग क्षेत्रातील सुधारणांसाठी १५ प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये सर्व बँकांचे कामकाज २४ तास सुरू ठेवणे, तसेच वर्षातील ३६५ दिवस बँका कार्यरत ठेवणे या महत्त्वाच्या मागण्यांचा समावेश आहे. आर्थिक प्रगतीसाठी बँकिंग सेवा अखंड सुरू राहणे आवश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

याशिवाय बँकांनी केवळ बँकिंग सेवा आणि ग्राहक सेवेकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, ग्राहकांना सन्मानपूर्वक, पारदर्शक आणि तत्पर सेवा द्यावी, तसेच टोकन पद्धतीने शिस्तबद्ध सेवा पुरवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**स्थानिक भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्याची मागणी**

बँक कर्मचाऱ्यांना प्रादेशिक भाषेचे ज्ञान असणे बंधनकारक करावे, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. अनेक ग्राहकांना स्थानिक भाषेत संवाद साधणे सोयीचे असते. त्यामुळे ग्राहक आणि बँक कर्मचारी यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होईल, असा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

**विमा, म्युच्युअल फंड विक्रीसाठी टार्गेटचा दबाव थांबवावा**

बँक कर्मचाऱ्यांवर विमा, म्युच्युअल फंड आणि इतर आर्थिक उत्पादनांच्या विक्रीसाठी अवाजवी टार्गेटचा दबाव टाकला जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. अशा दबावामुळे ग्राहकांची दिशाभूल होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे.

**अनावश्यक शुल्क आकारणीवर आक्षेप**

ग्राहकांकडून विविध नावाखाली अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याबद्दलही आंदोलनकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मूलभूत बँकिंग सेवा विनामूल्य उपलब्ध करून द्याव्यात आणि कोणतेही अनावश्यक शुल्क आकारू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

**स्वच्छ प्रसाधनगृह आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी घरपोच सेवा**

बँकांमध्ये ग्राहकांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज प्रसाधनगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) मार्गदर्शक सूचनांनुसार डोअरस्टेप बँकिंग सेवा उपलब्ध करून द्यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**रिक्त पदे भरणे आणि रोजगारनिर्मितीवर भर**

बँकांमधील रिक्त पदे तात्काळ भरून कर्मचारी संख्या वाढवावी, जेणेकरून ग्राहक सेवा अधिक प्रभावी होईल आणि बेरोजगारी कमी होण्यास मदत मिळेल, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. तसेच कर्मचारी भरती पारदर्शक, गुणवत्ताधारित आणि जबाबदारी निश्चित करणाऱ्या पद्धतीने करावी, असेही त्यांनी म्हटले आहे.

**शिस्तभंग आणि ग्राहकांची ताटकळ थांबवण्याची मागणी**

विनाकारण संपावर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, तसेच काही शाखांमध्ये "लंच ब्रेक"च्या नावाखाली कॅश काउंटर बंद ठेवून ग्राहकांना ताटकळत ठेवण्याचे प्रकार तात्काळ थांबवावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

बँकिंग व्यवस्थेतील या आणि इतर अनेक त्रुटींकडे केंद्र व राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आल्याचे भारतीय मित्र समूहाने स्पष्ट केले आहे.

या आंदोलनामुळे बँकिंग क्षेत्रातील ग्राहक सेवा, पारदर्शकता, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक व्यवहारांमधील उत्तरदायित्व याबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ग्राहकहिताच्या विविध मागण्यांमुळे या आंदोलनाकडे बँक ग्राहक, गुंतवणूकदार तसेच आर्थिक क्षेत्रातील तज्ज्ञांचे लक्ष लागले आहे.

या पत्रकार परिषदेला विजयकुमार अंकम, यल्लादास पारपेल्ली, कुमार नल्ला, जगदीश नल्ला आणि लक्ष्मण चंदनकेरी उपस्थित होते.

## महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अलर्ट



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आता नागरिकांना या उकाड्यापासून दिलासा मिळणार आहे. कारण, imdMumbai च्या अंदाजानुसार पुढील काही दिवस महाराष्ट्रात पाऊस कोसळण्याची शक्यता आहे.

मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात आज वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**2 जून रोजी चे हवामान**

पावसाचा येलो अलर्ट : पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव, नाशिक, नाशिक घाट, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाट, सांगली, सोलापूर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशीव, अकोला, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (40- 50 किमी तास) येण्याची शक्यता आहे.

पावसाचा ऑरेंज अलर्ट- कोल्हापूर, कोल्हापूर घाट, सातारा, सातारा घाट, छत्रपती संभाजीनगर, जालना, अमरावती या जिल्ह्यात काही तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वाऱ्यासह (वेग 50-60 किमी प्रति तासपर्यंत पोहोचण्याची शक्यता) पावसाची शक्यता आहे.

**3 जून रोजी चे हवामान**

पावसाचा येलो अलर्ट : पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नाशिक घाट, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाट, कोल्हापूर, कोल्हापूर घाट, सातारा, सातारा घाट, छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशीव, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (40- 50 किमी तास) येण्याची शक्यता आहे.

**4 जून रोजी चे हवामान**

पावसाचा येलो अलर्ट : पालघर, रायगड, रत्नागिरी, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, नाशिक, नाशिक घाट, कोल्हापूर, कोल्हापूर घाट, सातारा, सातारा घाट, नांदेड, लातूर, धाराशीव, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा या जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (40- 50 किमी तास) येण्याची शक्यता आहे.

## मंत्रालयात स्वतंत्र मराठा आरक्षण कक्ष स्थापन होणार



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घेत राज्य सरकारने अखेर ७२ तासांनंतर एक मोठा निर्णय घेतला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनादरम्यान मराठा समाजाच्या विविध प्रश्नांसाठी स्वतंत्र 'मराठा मंत्रालय' स्थापन करण्याची मागणी केली होती. मात्र, तांत्रिक आणि घटनात्मक बाबींमुळे असे स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणे शक्य नसले, तरी मंत्रालयात एक स्वतंत्र 'मराठा आरक्षण कक्ष' स्थापन केला जाईल, असे आश्वासन सरकारने दिले होते. त्यानुसार आज हा कक्ष स्थापन करण्याचा अधिकृत निर्णय घेण्यात आला आहे.

**उपसमितीच्या बैठकीत महत्त्वाचे आदेश**

आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक संपल्यानंतर, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केलेल्या विविध मागण्यांवर आणि मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

**विभागांना पूर्ततेचे आदेश**

जरांगे पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर संबंधित सर्व सरकारी विभागांनी आतापर्यंत काय भूमिका घेतली आहे आणि सद्यस्थिती काय आहे, याचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश विखे पाटील यांनी दिले. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. सध्या शाळा आणि महाविद्यालयांच्या प्रवेशाचे दिवस सुरू आहेत. त्यामुळे मराठा समाजातील तरुण मुला-मुलींना दाखले किंवा इतर कुठल्याही कागदपत्रांअभावी प्रवेश मिळण्यात अडचण येऊ नये, याची विशेष काळजी घेण्याच्या सूचना सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

**सरकारच्या निर्णयावर मनोज जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया**

सरकारने घेतलेल्या या निर्णयावर बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी संमिश्र प्रतिक्रिया दिली आहे. मी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करतो, पण मी अद्यापही पूर्णपणे समाधानी नाही, असे जरांगे पाटील म्हणाले. शासन निर्णय घेत आहे, परंतु ज्या वेगात व्हायला पाहिजे त्या वेगात मात्र होत नाही. विलंबामुळे मराठा मुला-मुलींचे नुकसान होत आहे, याकडे जरांगे पाटील यांनी लक्ष वेधले.

## सोलापुरात अवैध हातभट्टी व मद्यविक्रीविरोधात धडक कारवाई

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य उत्पादन शुल्क विभाग, सोलापूर यांनी जिल्ह्यात अवैध हातभट्टी निर्मिती, मद्य विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत २३ लाख ५६ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ६४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.





विभागीय उपायुक्त पुणे विभाग सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार तसेच अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर भाग्यश्री पं. जाधव, आणि उपअधीक्षक सौरभ बा. अदाटे. यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत सोलापूर शहर व जिल्ह्यात धडक कारवाई करण्यात आली.

या कारवाईत ४३ हजार १७५ लिटर रसायन, ३ हजार ७८३ लिटर हातभट्टी दारू, १६.२ बल्क लिटर देशी मद्य, १५.६ बल्क लिटर बिअर आणि १२५ बल्क लिटर ताडी असा मोठा साठा जप्त करण्यात आला. तसेच ४७ जणांवर कारवाई करून ३ वाहनांसह एकूण २३.५६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**२३.५६ लाखांचा मुद्देमाल जप्त**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने हातभट्टी निर्मितीचे समूळ उच्चाटन करण्यावर भर दिला असून पोलीस विभाग व इतर यंत्रणांच्या समन्वयाने संयुक्त कठोर कारवाया करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. अवैध मद्य विक्री, निर्मिती किंवा वाहतुकीसाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या मालकांनाही आरोपी करण्यात येत असल्याची माहिती विभागाने दिली.

दरम्यान, मिथेनॉलयुक्त बनावट दारूमुळे पुण्यात घडलेल्या दुर्घटनेचा संदर्भ देत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशा विषारी दारूमुळे किडनी निकामी होणे, कायमस्वरूपीचा अंधत्व येणे व अकाली मृत्यू यांसारखे गंभीर परिणाम संभवतात, असे विभागाने स्पष्ट केले.

गुन्हे अन्वेषणाच्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात १,१९७ गुन्हे, १,१०१ वारस, १,१२४ अटक आरोपी आणि ३ कोटी ३३ लाख २७ हजार १४९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. तर जानेवारी ते मे २०२६ या कालावधीत १,२९७ गुन्हे, १,२२१ वारस, १,२५४ अटक आरोपी आणि ५ कोटी ७३ लाख ३० हजार २०६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये गुन्ह्यांमध्ये ८ टक्के, वारसांमध्ये ११ टक्के, अटक आरोपींमध्ये १२ टक्के आणि मुद्देमालाच्या किमतीत ७२ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

अवैध मद्यनिर्मिती, विक्री, वाहतूक किंवा मिथेनॉल, क्लोरेल हायड्रेट यांसारख्या पदार्थाच्या वापराबाबत माहिती असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९ किंवा व्हॉट्स ॲप क्रमांक ८४२२००११३३ वर तात्काळ माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव यांनी सांगितले व अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

संपादकीय

# वैद्यकीय शिक्षणाचा सावळा गोंधळ!

देशाच्या आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या वैद्यकीय शिक्षण क्षेत्राला सध्या गैरव्यवहार, अनास्था आणि प्रशासकीय दिरंगाईचे मोठे ग्रहण लागले आहे. एकेकाळी शिक्षणाचे माहेरघर आणि पुरोगामी विचारांचे केंद्र म्हणून ओळखले जाणारा महाराष्ट्र आज नीट पेपरफुटीच्या केंद्रस्थानी येऊन पोहोचला आहे.

आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंची मुदत संपून सात महिने उलटले, तरीही नवीन नियुक्ती रखडलेलीच आहे. त्यातच राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या १८ वरून ३६ झाली असली, तरी त्यांपैकी एकही महाविद्यालय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे निकष पूर्ण करू शकत नाही, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे.

देशातील वैद्यकीय प्रवेश परीक्षा घोटाळ्याच्या केंद्रस्थानी सध्या महाराष्ट्र सापडला आहे. राज्यातील आयुर्विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या नियुक्तीसाठी पात्र व्यक्तींची नावे कुलपतींच्या कार्यालयाकडे पाठवून काही महिने उलटले, तरी कुलगुरूपदाची नियुक्ती रखडली आहे. शिवाय, राज्यातील सुमारे ६० टक्के शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत दीर्घकाळ प्रभारी अधिष्ठातापदाचा कार्यभार संपुष्टात आणण्यासाठी लोकसेवा आयोगाने मुलाखतींचा कार्यक्रम ऐनवेळी रद्द करून महिना उलटला, तरी मुलाखतींचा कार्यक्रम जाहीर होत नाही आणि राज्यातील महाविद्यालयांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत. वैद्यकीय शिक्षणाच्या गंभीर दुरवस्थेचे हे चित्र कुठे आहे? संपूर्ण देशालाच नव्हे, तर प्रगत देशातील विद्वानांनाही धक्का बसेल, असे महाराष्ट्राचे हे चित्र आहे. पुण्याला विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. परंतु, सध्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या (नीट) घोटाळ्यात या पुण्यातील काही शिक्षकांनी नैतिकतेलाच सोडचिठ्ठी दिल्याचे प्रकरण सीबीआयच्या तपासामध्ये पुढे आले. पैशाच्या मोहापायी शिक्षकांनीच पेपर फोडल्याचा आरोप आहे. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अग्रेसर असलेला पुरोगामी महाराष्ट्र सध्या 'नीट' घोटाळ्याच्या केंद्रस्थानी आला आहे. या अधोगतीला वा कलंकाला जबाबदार कोण? शिक्षकांनी शिकवणी घेऊ नये, इथंपासून संस्थाचालकांनी कॅपिटेशन फी म्हणजेच डोनेशन घेऊ नये, यासाठी कडक कायदा आहे. परंतु, या कायद्याची अंमलबजावणी कोण करते? महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस यांचे साटेलोटे झाल्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुलांवर शैक्षणिक अनाथ होण्याची वेळ आली आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदावर कार्यरत असलेल्या लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर यांची मुदत ७ महिन्यांपूर्वी संपुष्टात आली. या पदाच्या नियुक्ती प्रक्रियेत मार्चमध्ये मुलाखतीअंती समितीने पाच उमेदवारांची शिफारस कुलपतींना केली. त्यानंतर शिवाजी विद्यापीठ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ या दोन विद्यापीठांना नवे कुलगुरू मिळाले. पण आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती रखडल्या आहेत.

२००४ मध्ये राज्यात १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये होती. आता त्यांची संख्या ३६ झाली आहे. यापैकी एकही महाविद्यालय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या शिक्षकांचा निकष पूर्ण करण्यास पात्र नाही. राज्याचा वैद्यकीय शिक्षण विभाग राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाची दिशाभूल करून वैद्यकीय महाविद्यालयांची मान्यता मिळविण्यात यशस्वी झाला. पण आज या महाविद्यालयांत सुमारे ५० टक्के शिक्षकांची पदे रिक्त आहेत आणि नव्या वैद्यकीय महाविद्यालयांच्या उभारणीचा सपाटा सुरू आहे. सध्याच्या महाविद्यालयांपैकी २० महाविद्यालयांत अधिष्ठातापदाचा कार्यभार देण्यात आला आहे. तेथे पूर्णवेळ पात्र अधिष्ठाता नाहीत. या रिक्त पदावर नियुक्तीसाठी ११ फेब्रुवारी रोजी मुलाखतीचा कार्यक्रम होता. परंतु, तो ऐनवेळी पुढे ढकलण्यात आला आणि अद्यापही त्याविषयी स्पष्टता नाही. मध्यंतरी राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने अधिष्ठात्यांची नियुक्ती लोकसेवा आयोगाच्या निवड समितीमार्फत करण्याऐवजी पदोन्नतीने करावी, असा एक प्रस्ताव तयार केला. त्यावर वैद्यकीय शिक्षण विभागाचे मत मागविण्यात आले. त्यावरही अद्याप निर्णय झाला नाही. जर बुलेट ट्रेनच्या जमान्यात आपण बैलगाडी हाकणार असू, तर महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण धोक्याच्या वळणावर उभे आहे, हे सांगण्यासाठी कोणा विद्वानाची गरज भासणार नाही.

# सायकल : शाश्वत भविष्याचा जीवनमार्ग



दरवर्षी ३ जून हा दिवस जगभरात 'जागतिक सायकल दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने २०१८ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देऊन सायकलच्या सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक महत्त्वाला जागतिक स्तरावर अधोरेखित केले. मानवाच्या इतिहासातील सर्वात साध्या, स्वस्त, विश्वासार्ह आणि उपयुक्त शोधांपैकी एक म्हणून सायकलकडे पाहिले जाते. दोन चाकांवर चालणारे हे साधे वाहन केवळ प्रवासाचे साधन नसून आरोग्यदायी जीवनशैली, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता आणि शाश्वत विकास यांचे प्रतीक बनले आहे. आजच्या आधुनिक युगात मोटारगाड्या, दुचाकी, रेल्वे, विमान यांसारख्या जलद वाहतूक साधनांची उपलब्धता वाढली असली तरी सायकलचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट वाढते प्रदूषण, वाहतुकीची समस्या, इंधन संकट, हवामान बदल आणि आरोग्यविषयक आव्हाने यामुळे सायकलचे महत्त्व पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे. त्यामुळे जागतिक सायकल दिन हा केवळ एका वाहनाचा गौरव करणारा दिवस नसून मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलित नात्याची जाणीव करून देणारा दिवस आहे.

सायकलचा इतिहास पाहिला तर तो अत्यंत रंजक आणि प्रेरणादायी आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला सायकलच्या विविध स्वरूपांचा विकास सुरू झाला. १८१७ मध्ये जर्मनीतील संशोधक कार्ल व्हॉन ड्राइस यांनी 'ड्रेझीन' नावाचे दोन चाकांचे वाहन विकसित केले. त्यानंतर अनेक संशोधकांनी त्यात सुधारणा केल्या आणि आधुनिक सायकलचा जन्म झाला. पेडल, चेन, ब्रेक आणि रबरी टायर यांचा समावेश झाल्यानंतर सायकल अधिक सुरक्षित आणि उपयुक्त बनली. औद्योगिक क्रांतीनंतर सायकलचा प्रसार झपाट्याने वाढला. ती सामान्य माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली. विशेषतः कामगार, विद्यार्थी, शेतकरी आणि मध्यमवर्गीय लोकांसाठी सायकल हे स्वस्त आणि विश्वासार्ह वाहतूक साधन ठरले. भारतातही ब्रिटिश काळात सायकलचा प्रसार झाला आणि हळूहळू ती ग्रामीण व शहरी जीवनाचा महत्त्वाचा भाग बनली.

सायकलचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची साधी रचना आणि सहज उपलब्धता. पेट्रोल, डिझेल, वीज किंवा इतर कोणत्याही इंधनाची गरज नसलेले हे वाहन मानवी शक्तीवर चालते. त्यामुळे ती आर्थिकदृष्ट्या अत्यंत किफायतशीर आहे. वाढत्या महागाईच्या काळात वाहतुकीसाठी होणारा खर्च कमी करण्यासाठी सायकल हा सर्वोत्तम पर्याय ठरतो. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सायकल आजही उपयुक्त वाहतूक साधन आहे. विशेषतः ग्रामीण भागात शाळा, बाजारपेठ, शेत आणि विविध कामांसाठी जाण्यासाठी लाखो लोक सायकलचा वापर करतात. अनेक विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या प्रवासात सायकल ही महत्त्वाची साथीदार ठरते. त्यामुळे सायकल ही सामाजिक आणि आर्थिक समतेचे प्रतीक मानली जाते.

आरोग्याच्या दृष्टीने सायकलचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. कार्यालयीन कामे, संगणकाचा वाढता वापर, मोबाईल आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे लोक अधिक वेळ बसून राहू लागले आहेत. परिणामी लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत सायकल चालविणे हा अत्यंत प्रभावी आणि सोपा व्यायाम आहे. सायकल चालविताना शरीरातील जवळपास सर्व स्नायू सक्रिय होतात. हृदयाची कार्यक्षमता वाढते, रक्ताभिसरण सुधारते, फुफ्फुसांची क्षमता वाढते आणि शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. नियमित सायकलिंगमुळे शरीर तंदुरुस्त राहते तसेच अनेक गंभीर आजारांचा धोका कमी होतो.

मानसिक आरोग्य सुधारण्यातही सायकल महत्त्वाची भूमिका बजावते. वेगवान आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे मानसिक ताणतणाव, चिंता आणि नैराश्य यांचे प्रमाण वाढत आहे. सायकल चालविताना व्यक्ती निसर्गाच्या सान्निध्यात येते, मोकळ्या हवेत वेळ घालवते आणि मनाला आनंद देणारा अनुभव मिळवते. यामुळे मानसिक तणाव कमी होतो आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. अनेक संशोधनांमध्ये नियमित सायकलिंगमुळे आत्मविश्वास वाढतो, मन प्रसन्न राहते आणि मानसिक स्वास्थ्य सुधारते असे दिसून आले आहे. त्यामुळे सायकल ही केवळ शारीरिक आरोग्याची नव्हे तर मानसिक आरोग्याचीही प्रभावी गुरुकिल्ली आहे.

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सायकलचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. आज जगासमोर उभे असलेले सर्वात मोठे संकट म्हणजे हवामान बदल. औद्योगिकीकरण, वाढती वाहनसंख्या आणि जीवाश्म इंधनांचा प्रचंड वापर यामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आहे. परिणामी जागतिक तापमानवाढ, अनियमित पाऊस, पूर, दुष्काळ आणि विविध नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढत आहे. मोटार वाहनांमधून होणारे वायुप्रदूषण हे या समस्येचे एक प्रमुख कारण आहे. सायकल मात्र कोणतेही प्रदूषण निर्माण करत नाही. ती कार्बनमुक्त वाहतुकीचे सर्वोत्तम उदाहरण आहे. अधिकाधिक लोकांनी सायकलचा वापर केल्यास इंधनाची बचत होईल, प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरणाचे संरक्षण होईल.

शहरी भागांमध्ये वाहतूक कोंडी ही गंभीर समस्या बनली आहे. मोठ्या शहरांमध्ये वाहनांची संख्या प्रचंड वाढल्यामुळे रस्त्यांवर सतत गर्दी असते. यामुळे वेळेचा अपव्यय, इंधनाचा जास्त वापर आणि प्रदूषण वाढते. अशा परिस्थितीत सायकल हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. सायकलला कमी जागा लागते, ती सहजपणे चालवता येते आणि वाहतुकीवरील ताण कमी करते. जगातील अनेक विकसित देशांनी सायकलस्नेही शहरे उभारण्यावर भर दिला आहे. स्वतंत्र सायकल मार्ग, सुरक्षित पार्किंग आणि सार्वजनिक सायकल शेअरिंग यंत्रणा यांमुळे सायकलचा वापर वाढला आहे. भारतातील काही शहरांनीही या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

सायकल आणि शाश्वत विकास यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये आरोग्य, पर्यावरण संरक्षण, गरिबी निर्मूलन, स्वच्छ ऊर्जा आणि शाश्वत शहरे यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. सायकल या सर्व उद्दिष्टांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे हातभार लावते. ती स्वस्त वाहतूक उपलब्ध करून देते, आरोग्य सुधारते, प्रदूषण कमी करते आणि ऊर्जा बचतीला प्रोत्साहन देते. त्यामुळे शाश्वत विकासाच्या दृष्टीने सायकल हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो.

भारतातील ग्रामीण भागात सायकलचे महत्त्व विशेष अधोरेखित करावे लागेल. ग्रामीण भागात अनेक गावांमध्ये सार्वजनिक वाहतुकीची सुविधा मर्यादित असते. अशा ठिकाणी सायकल हे लोकांचे दैनंदिन जीवन सुलभ करणारे साधन आहे. शेतकरी शेतात जाण्यासाठी, विद्यार्थी शाळेत जाण्यासाठी, कामगार कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी आणि महिला विविध घरगुती कामांसाठी सायकलचा वापर करतात. अनेक सामाजिक योजनांमधून विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले आहे. या योजनांमुळे मुलींच्या शिक्षणात सकारात्मक बदल झाला आहे. शाळेपर्यंतचे अंतर कमी झाल्यामुळे त्यांचे शिक्षण सुरू ठेवणे सोपे झाले आहे. त्यामुळे सायकल ही ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरणाचे प्रभावी साधन ठरली आहे.

महिलांच्या सक्षमीकरणात सायकलची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. एकेकाळी महिलांना सायकल चालविणे हे समाजात सहज स्वीकारले जात नव्हते. परंतु कालांतराने परिस्थिती बदलली. सायकलने महिलांना स्वतंत्रपणे प्रवास करण्याची संधी दिली. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागासाठी त्यांना गतिशीलता प्राप्त झाली. ग्रामीण भागातील अनेक मुलींसाठी सायकल ही शिक्षणाकडे जाणारी वाट ठरली आहे. आज अनेक महिला सायकलिंग स्पर्धांमध्ये सहभागी होत आहेत, साहसी सायकल मोहिमा राबवत आहेत आणि समाजाला प्रेरणा देत आहेत. त्यामुळे सायकल ही महिला स्वातंत्र्य आणि समानतेचेही प्रतीक बनली आहे.

क्रीडा क्षेत्रात सायकलिंगला विशेष स्थान आहे. सायकलिंग हा जगातील लोकप्रिय क्रीडाप्रकारांपैकी एक आहे. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये हजारो खेळाडू सहभागी होतात. सायकलिंगमुळे शारीरिक क्षमता, सहनशक्ती आणि मानसिक दृढता वाढते. अनेक देशांमध्ये सायकलिंगला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रशिक्षण केंद्रे आणि स्पर्धांचे आयोजन केले जाते. भारतातही सायकलिंगविषयी जागरूकता वाढत असून अनेक तरुण या क्रीडाप्रकाराकडे आकर्षित होत आहेत.

कोविड-१९ महामारीच्या काळात सायकलचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले. लॉकडाऊननंतर अनेक लोकांनी सार्वजनिक वाहतुकीऐवजी सायकलचा वापर सुरू केला. आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि सुरक्षित प्रवासासाठी सायकल हा उत्तम पर्याय असल्याचे लोकांच्या लक्षात आले. अनेक शहरांमध्ये सायकल विक्रीत मोठी वाढ झाली. महामारीनंतरही अनेकांनी सायकलिंगची सवय कायम ठेवली. यामुळे आरोग्य आणि पर्यावरण या दोन्ही क्षेत्रांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून आले.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सायकलच्या क्षेत्रातही अनेक नवकल्पना झाल्या आहेत. आधुनिक सायकली अधिक हलक्या, सुरक्षित आणि कार्यक्षम बनल्या आहेत. इलेक्ट्रिक सायकल किंवा ई-बाईक ही संकल्पना वेगाने लोकप्रिय होत आहे. अशा सायकलींमध्ये बॅटरीच्या सहाय्याने अतिरिक्त ऊर्जा मिळते. त्यामुळे लांब अंतराचा प्रवास अधिक सोपा होतो. तरीही पारंपरिक सायकलचे महत्त्व कमी झालेले नाही. कारण ती पूर्णपणे पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी आहे.

आजच्या तरुण पिढीसमोर सायकलचा वापर वाढविण्याचे मोठे आव्हान आहे. मोबाईल, इंटरनेट आणि आधुनिक वाहतुकीच्या साधनांमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. त्यामुळे तरुणांनी नियमित सायकलिंगचा स्वीकार करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि विविध सामाजिक संस्था यांनी सायकलिंगविषयी जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. सायकल रॅली, जनजागृती मोहीम आणि आरोग्यविषयक कार्यक्रमांद्वारे सायकलचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवता येईल.

सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिकाही या संदर्भात महत्त्वाची आहे. सुरक्षित सायकल मार्ग, सायकल पार्किंग सुविधा, सार्वजनिक सायकल भाडे योजना आणि सायकलस्नेही धोरणे यांची अंमलबजावणी केल्यास सायकलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. अनेक विकसित देशांनी अशा उपाययोजनांद्वारे वाहतूक आणि प्रदूषणाच्या समस्या कमी केल्या आहेत. भारतातही अशा उपक्रमांना गती देण्याची आवश्यकता आहे.

जागतिक सायकल दिन साजरा करण्यामागील उद्देश केवळ सायकलचा प्रचार करणे नाही, तर समाजाला शाश्वत आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणे हा आहे. या दिवशी विविध देशांमध्ये सायकल रॅली, आरोग्य जनजागृती कार्यक्रम, पर्यावरण संवर्धन मोहिमा आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित केले जातात. लोकांना सायकलचा अधिक वापर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. विशेषतः तरुण पिढीला सायकलचे महत्त्व पटवून देण्यावर भर दिला जातो.

सायकल हा केवळ भूतकाळातील वाहतुकीचा वारसा नाही, तर भविष्यातील शाश्वत विकासाचा मार्ग आहे. वाढती लोकसंख्या, मर्यादित संसाधने, हवामान बदल आणि आरोग्यविषयक आव्हाने यांचा विचार करता सायकलचे महत्त्व आणखी वाढणार आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात शक्य तितक्या प्रमाणात सायकलचा वापर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अगदी अल्प अंतरासाठीही मोटार वाहनाऐवजी सायकलचा वापर केल्यास वैयक्तिक आरोग्य सुधारेल, आर्थिक बचत होईल आणि पर्यावरणाचे संरक्षण होईल.

अखेर, जागतिक सायकल दिन आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की, प्रगती म्हणजे केवळ वेगवान आणि महागडी साधने नव्हेत, तर मानव आणि निसर्ग यांच्यातील समतोल जपणारी जीवनशैलीही आहे. सायकल हा त्या समतोलाचा सर्वात सुंदर आणि प्रभावी नमुना आहे. आरोग्यदायी शरीर, स्वच्छ पर्यावरण, आर्थिक बचत, सामाजिक समता आणि शाश्वत विकास या सर्व मूल्यांना एकत्र जोडणारे साधन म्हणून सायकलकडे पाहणे आवश्यक आहे. दोन चाकांवर चालणारी ही साधी रचना मानवजातीला अधिक निरोगी, अधिक समृद्ध आणि अधिक शाश्वत भविष्याकडे घेऊन जाण्याची क्षमता बाळगते. त्यामुळे जागतिक सायकल दिनानिमित्त आपण सर्वांनी सायकलचा अधिकाधिक वापर करण्याचा संकल्प करावा आणि आरोग्य, पर्यावरण तसेच समाजहितासाठी या साध्या पण महान साधनाचा स्वीकार करावा. सायकल ही केवळ प्रवासाची सोय नसून निरोगी जीवन, हरित पृथ्वी आणि उज्ज्वल भविष्याकडे नेणारा विश्वासार्ह जीवनमार्ग आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

## छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्राचार्य पदी नितीन मोटे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्राचार्य पदी डॉ. नितीन मोटे यांची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी डॉ.मोटे हे पुण्यातील वडगाव येथील शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालयात उपप्राचार्य म्हणून काम केले असून एनएसएस कार्यक्रमाधिकारी आणि विभाग समन्वयक म्हणूनही त्यांनी सेवा बजावले आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठशी सलग्नित विविध महाविद्यालयात वक्ता म्हणून व्याख्याने दिली आहेत. नुकतीच त्यांची सोलापुरातील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्राचार्य पदी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचा संस्थेचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सरचिटणीस महेश माने, छत्रपती शिवाजी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, माजी प्राचार्य अरुण मित्रगोत्री सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, त्यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षिकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## किमान वेतनावर सरकार ठाम; दोन दिवसांत ऐतिहासिक निर्णयाची घोषणा

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील लाखो विडी कामगारांच्या किमान वेतनाच्या प्रश्नावर आज मंत्रालयात पार पडलेली बैठक अत्यंत सकारात्मक आणि आशादायी ठरली. विडी कामगारांना शासनाने जाहीर केलेले किमान वेतन आणि त्याचा फरक तात्काळ मिळावा, या मागणीवर सरकारने ठाम भूमिका घेतल्याने कामगारांमध्ये समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवार, दिनांक २ जून रोजी मा. कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या मंत्रालयातील कार्यालयात विडी कामगारांच्या किमान वेतन, रोख मजुरी व पेन्शनच्या प्रश्नासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत कामगार संघटना, कारखानदार संघटना आणि शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत विडी कारखानदारांच्या प्रतिनिधींनी किमान वेतन लागू करण्यास विरोध दर्शवत, "किमान वेतन देणे शक्य नाही; मात्र दर हजार विड्यांमागे १० ते २० रुपये मजुरी वाढ देऊ," अशी भूमिका मांडली. मात्र, या भूमिकेला राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी स्पष्ट आणि ठाम शब्दांत उत्तर दिले.

"तुम्ही कोणतीही भूमिका घ्या, पण सरकार दोन दिवसांत आपला निर्णय जाहीर करणार आहे." शासनाचा निर्णय सर्वांना बंधनकारक असेल आणि त्याची अंमलबजावणी करावीच लागेल.

मंत्री महोदयांनी घेतलेल्या या स्पष्ट आणि निर्भीड भूमिकेमुळे बैठकीत कामगारांच्या बाजूने वातावरण निर्माण झाले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या किमान वेतनाच्या प्रश्नावर सरकारने पहिल्यांदाच इतकी ठाम भूमिका घेतल्याने विडी कामगारांच्या न्याय्य हक्काच्या लढ्याला नवे बळ मिळाले आहे.



बैठकीत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रोख मजुरी संदभार्तील निर्णयही शासनाकडून घेण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले. त्यामुळे मजुरी देण्यातील अनियमितता, कपात आणि पारदर्शकतेच्या प्रश्नांवरही मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विडी कामगारांना किमान ₹१० हजार मासिक पेन्शन मिळावी, या मागणीवरही सकारात्मक चर्चा झाली. याबाबत कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निर्णयासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे वृद्ध विडी कामगारांच्या पेन्शनच्या प्रश्नालाही नवी आशा निर्माण झाली आहे.

ज्येष्ठ कामगार नेते, माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी २०१४ पासून विडी कामगारांना किमान वेतन मिळावे यासाठी सातत्याने संघर्ष उभारला आहे. आंदोलने, निवेदने, मंत्रालयीन बैठका आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच आज हा प्रश्न निर्णायक टप्प्यावर पोहोचला असल्याची भावना कामगारांनी व्यक्त केली.

सरकारने स्पष्टपणे कामगारांची बाजू घेतल्याने आणि किमान वेतनाच्या अंमलबजावणीबाबत कठोर भूमिका जाहीर केल्याने महाराष्ट्रातील लाखो विडी कामगारांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला आहे. आता सर्वांचे लक्ष येत्या दोन दिवसांत होणाऱ्या शासनाच्या निर्णयाकडे लागले आहे.

कामगार संघटनांनी बैठकीनंतर स्पष्ट इशारा देत सांगितले की, "किमान वेतन हा दया-दाक्षिण्याचा विषय नाही; तो कामगारांचा कायदेशीर आणि संविधानिक हक्क आहे. हा हक्क मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील."

राज्य सरकारने कामगारांच्या बाजूने घेतलेली ठाम भूमिका आणि येत्या दोन दिवसांत होणाऱ्या निर्णयाची घोषणा यामुळे विडी कामगारांच्या दशकांपासून सुरू असलेल्या न्यायाच्या लढ्याला ऐतिहासिक वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## निवडणूक निरीक्षक हार्डीकर यांच्याशी या 7028909273 क्रमांकावर संपर्क साधावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाने दिनांक 18 मे 2026 रोजी महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदार संघ द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने सोलापूर विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदार संघासाठी श्रवण हार्डीकर यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. तरी या मतदार संघातील नागरिकांना/ मतदारांना निवडणूक कामकाजाविषयी काही अडचणी असतील तर हार्डीकर यांच्याशी 7028909273 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले आहे.

## मानेगावचे सुरज पाटील यांना राज्यस्तरीय कृषीरत्न पुरस्कार



**मानेगाव (कटूसत्य वृत्त):-** धाराशिव येथील अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या 32 व्या संमेलनात माढा तालुक्यातील मानेगावचे युवा उद्योजक सुरज निलकंठ पाटील यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल साहित्य परिषदेच्या वतीने दिला जाणारा महात्मा फुले राज्यस्तरीय कृषीरत्न पुरस्कार- 2026 संमेलनाध्यक्ष डॉ.नंदकुमार राऊत यांच्या हस्ते व स्वागताध्यक्ष आमदार कैलास घाडगे-पाटील,शिक्षक आमदार विक्रम काळे व परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष निमंत्रक साहित्यिक डॉ.शरद गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्मृतिचिन्ह,शाल व पुष्पगुच्छ देऊन प्रदान करण्यात आला.

युवा उद्योजक सुरज पाटील हे केमिस्ट्री विषयातून एमएससी पदवीधारक आहेत तरीही त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नवनवीन प्रयोग करून शेतीतून ऊस, द्राक्षे, टोमॅटो, झेंडू, कांदे, सोयाबीन, उडीद, तूर आदींचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले. शेतकऱ्यांकडील तूर, हरभरा, उडीद हमीभावाने खरेदी करण्यासाठी कृषीसखा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी सुरू केलेली आहे.शेतकऱ्यांकडील बेदाण्याचे नेटिंग, ग्रेडिंग व आकर्षक पॅकिंग करण्यासाठी कृषीसखा फार्मर्स बेदाणा नेटिंग व ग्रेडिंग उद्योगाची उभारणी केली आहे. या दोन्ही उद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य दरात सेवा तसेच वेळोवेळी मार्गदर्शन करण्याचे काम ते करीत आहेत. कृषी क्षेत्रातील बदल, प्रयोग व नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी ते वेळोवेळी कृषी तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करतात.त्याबद्दल त्यांना या मानाच्या राज्यस्तरीय कृषीरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.ते मानेगावचे माजी सरपंच तथा विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याचे माजी संचालक निलकंठ पाटील यांचे सुपुत्र आहेत.ते माढा येथील प्रगतशील शेतकरी अशोक पांडुरंग चव्हाण यांचे जावई आहेत.

यावेळी साहित्य परिषदेचे विश्वस्त चेअरमन अनिलकुमार अनभुले, कवी फुलचंद नागटिळक, गोरक्षनाथ भांगे, माजी सरपंच संतोष अनभुले, मुख्याध्यापक अनिलकुमार बरकडे, आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड, डॉ.तानाजी जाधव,विशाल अनभुले, ओमराज सावंत यांच्यासह शेतकरी, लेखक, कवी, शिक्षक व साहित्यिक उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# गजीनृत्य अन ढोल-ताशांच्या गजरात दिमाखात निघाली शोभायात्रा!



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** खास धनगरी गजीनृत्य अन ढोल-ताशांच्या निनादात, कैताळाच्या गजरात आणि पिवळ्या फेट्यांच्या साक्षीने निघालेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची भव्य शोभायात्रा म्हणजे अहिल्यादेवींच्या कायार्ला वाहिलेला एक मानाचा मुजरा ठरला. अहिल्यादेवी, मल्हारी मार्तंड, म्हाळसा आणि बानू यांच्या रूपातील अत्यंत प्रभावी जिवंत देखाव्यांनी सोलापूर शहरवाशीयांचे लक्ष वेधून घेतले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंती सप्ताह सांगतानिमित्त शनिवारी नॉर्थ कोट मैदान पासून ते अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यापर्यंत भव्य आणि दिव्य शोभायात्रा काढण्यात आली. कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या प्रमुख मार्गदर्शन आणि उपस्थितीत निघालेल्या या शोभायात्रेचा शुभारंभ पोलीस आयुक्त एम. राजकुमार आणि महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते करण्यात आला. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, प्रा. देवानंद चिलवंत, डॉ. आयेशा रंगरेज, अधिसभा सदस्य रोहिणी तडवळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे आदींसह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने यात सहभागी झाले.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या ढोल-ताशा आणि कैताळाच्या गजराने शोभायात्रेला सुरुवात झाली. ढोल-ताशा पथकांनी ताल, कौशल्य आणि उर्जा यांच्या संगमातून वातावरण भारून टाकले. अहिल्यादेवींच्या वेशातील कलाकाराने साधी पण तेजस्वी वेशभूषा, कपाळावरील कुंकू, हातातील शिवपिंड आणि चेहऱ्यावरचे सात्विक भाव यामुळे प्रत्यक्ष अहिल्यादेवींचे भासमान रूप साकारले.

मल्हारी मार्तंड, म्हाळसा आणि बानू या देखाव्यांनीही विशेष दाद मिळवली. हातात खड्ग आणि भंडारा घेऊन घोड्यावर स्वार झालेला मल्हारी मातंर्डांचा देखावा पराक्रमाची साक्ष देत होता. म्हाळसा आणि बानू यांच्या पारंपरिक वेशभूषा, अलंकार आणि भावभिनयांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. अहिल्यादेवींच्या श्रद्धास्थानांपैकी खंडोबा मंदिराचा त्यांनी केलेला जीर्णोद्धार लक्षात घेता हे देखावे त्यांच्या धार्मिक कायार्ची सार्थ कल्पना उपस्थितांपर्यंत पोहोचवत होते.

शोभायात्रेत सहभागी झालेल्या महिलांनी डोक्यावर परिधान केलेले पिवळे फेटे आकर्षणाचा वेगळाच रंग भरत होते. अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिधान केलेल्या हजारो पिवळ्या फेट्यांमुळे शोभायात्रेला भव्यता आणि एकसंधतेची आगळी ओळख प्राप्त झाली. उपकुलसचिव डॉ. उमराव मेटकरी, सहाय्यक कुलसचिव सोमनाथ सोनकांबळे, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुनील थोरात आणि उपाध्यक्ष कांचन आघाव यांच्या समितीने शोभायात्रेचे उत्कृष्ट नियोजन केले. संपूर्ण शोभायत्रेचे सूत्रसंचालन सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

# महावितरणच्या अधिकाऱ्याला शिवीगाळ व धक्काबुक्की

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील हिंगणी येथील महावितरण उपकेंद्रात कर्तव्य बजावत असलेल्या सहायक अभियंत्यास शिवीगाळ, दमदाटी व धक्काबुक्की करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, महावितरणच्या केत्तूर शाखेचे सहाय्यक अभियंता मंदार दिलीप राजमाने यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. हिंगणी परिसरात वादळी वाऱ्यामुळे पडलेल्या वीज खांबांच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना, सोमवार (दि. १ जून) रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास सचिन फुलचंद जाधव व प्रकाश धनराज जाधव, दोघेही रा. हिंगणी (ता. करमाळा) हे महावितरणच्या कार्यालयात आले. फिर्यादीनुसार, संबंधितांनी वीजपुरवठ्याच्या कारणावरून अधिकाऱ्याला शिवीगाळ व दमदाटी केली. गोंधळाचा आवाज ऐकून उपकेंद्रातील कर्मचारी संताजी हरींद्र बाबर हे मध्यस्थीसाठी आले असता, त्यांनाही मारहाण करण्यात आली. तसेच फिर्यादी राजमाने यांनाही धक्काबुक्की करून कार्यालय बंद करण्याची धमकी देण्यात आली. या प्रकारामुळे सरकारी कामकाजात अडथळा निर्माण झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) 2023 मधील कलम 132, 3(5), 351(2) व 352 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सुहास विठ्ठल पवार करीत आहेत.

# सोलापूरात अंध महिला क्रिकेट प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात समारोप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइन्ड इन इंडिया (CABI) यांच्या वतीने इंदिरा गांधी क्रिकेट स्टेडियम येथे आयोजित अंध महिला क्रिकेट प्रशिक्षण शिबिराचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. ५ मे ते २१ मे दरम्यान पार पडलेल्या या शिबिरात महाराष्ट्रातील विविध भागांतील २५ अंध महिला क्रिकेटपटूंनी सहभाग घेतला होता.

समारोप कार्यक्रमाला सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) कुशल जैन प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी सहभागी खेळाडूंच्या जिद्द, आत्मविश्वास आणि क्रीडाप्रेमाचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे टी-२० विश्वचषक विजेत्या अंध महिला क्रिकेट संघाच्या उपकर्णधार कु. गंगा संभाजी कदम यांचा कुशल जैन यांच्या हस्ते करण्यात आलेला विशेष सत्कार. गंगा कदम यांच्या यशस्वी प्रवासाने उपस्थित प्रशिक्षणार्थी मुलींना प्रेरणा मिळाली.

यावेळी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत रेबर्सू, CABIच्या कु. राजश्री रमावत, राजू शेळके तसेच प्रशिक्षक व मान्यवर उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

# शेतकऱ्यांनी पायाभूत सुविधा व प्रक्रिया-पॅकेजिंग युनिटसाठी अर्ज सादर करावेत

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सन २०२६-२७ च्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कडधान्य पिकांच्या मूल्यवर्धनास चालना देण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत काढणीनंतरची पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट स्थापनेस आर्थिक सहाय्य देण्यात येणार असून, प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या ३३ टक्के किंवा २५ लाख रुपये (जे कमी असेल) इतके अनुदान मिळणार आहे.

सोलापूर जिल्ह्यासाठी या योजनेअंतर्गत २ लक्षांक प्राप्त झाले असून शेतकरी उत्पादक संघ, शेतकरी उत्पादक कंपनी, प्राथमिक कृषि पतसंस्था तसेच वैयक्तिक अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात दि.२० जून २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

**योजनेच्या अटी व आवश्यक कागदपत्रे**

- बँक प्रस्ताव : अर्जदारांनी राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक.
- कर्ज मंजुरी : बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतरच लाभासाठी पात्रता.
- नोंदणी व कार्यरत : संघ/पतसंस्था/कंपनी मागील दोन वर्षांपासून विधिवत नोंदणीकृत व कार्यरत असणे आवश्यक.
- ऑडिट अहवाल : मागील दोन वर्षांचे ऑडिट अहवाल सादर करणे बंधनकारक.
- जमिनीचे उतारे : वैयक्तिक अर्जदारांच्या नावावर ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक.
- वयाची अट : अर्जदाराचे वय किमान २१ वर्ष पूर्ण असावे.
- कुटुंबातील पात्रता : एका कुटुंबातील केवळ एका व्यक्तीस आर्थिक सहाय्य मंजूर.
- मार्जिन मनी : प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम स्वतः उभारण्याची क्षमता असावी.

**जाहिर प्रसिध्दीकरण** कि.अर्ज.नं.३९६/२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

श्री.अमोगसिध्द चंद्रकांत पुजारी,वय-२६ वर्षे, धंदा- शेती, रा. मिरी, ता.मोहोळ,जि.सोलापूर.सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मिरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर. }सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची आई शिला चंद्रकांत पुजारी यांचा दि.४/१०/२०१८ रोजी मौजे मिरी,ता.मोहोळ,जि.सोलापूर येथे मृत्यु झाला असलेने अर्जदार हा त्यांचा मुलगा असुन अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे आई शिला चंद्रकांत पुजारी यांच्या मृत्यु दाखल्याची ता.२५/९/२०२५ रोजी मागणी केलेली होती, परंतु सदर ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत मिरी, ता.मोहोळ,जि.सोलापूर यांनी त्यांच्या अभिलेखात २०१८ सालचे संपुर्ण अभिलेख तपासले असता अर्जदाराची आई शिला चंद्रकांत पुजारी यांच्या मृत्युची नोंद नमुद नसल्याचे दिसुन आलेले असुन त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात ग्रामपंचायत मिरी, ता. मोहोळ चे मृत्यु रजिस्टरला नोंद घेवुन अर्जदार यांना तसे मृत्यु प्रमाणपत्र देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करणेबाबत अर्ज केला आहे. याबाबत कोणाची हरकत, आक्षेप असल्यास दि.१७/०६/२०२६ रोजी समक्ष अथव वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावेत. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे मृत्युचा दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिलेअसे.ता. ०२/०६/२०२६

(शिक्का) सही/- तहसिलदार,मोहोळ.

**जाहिर प्रसिध्दीकरण** कि.अर्ज.नं.२४९/२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

सना आयुब बागवान,(लग्नापुर्वीचे नांव) सना जावीद बागवान,(लग्नानंतरचे नांव) वय-२८ वर्षे,धंदा-घरकाम,रा.प्लॉट नं.१६०,किसन नगर,अक्कलकोट रोड, सोलापूर दक्षिण,सोलापूर, जि.सोलापूर. } अर्जदार

विरूध्द


ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मिरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर. }सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार सना आयुब बागवान (लग्नापुर्वीचे नांव) सना जावीद बागवान (लग्नानंतरचे नांव) यांचा जन्म ता. ३०/०३/१९९९ रोजी मोहोळ, ता. मोहोळ येथे झालेला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद मोहोळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि. १७/६/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता. ०२/०६/२०२६

(शिक्का) सही/- तहसिलदार,मोहोळ.

# विजापूर रोडवर भीषण अपघात; दुचाकीवरील दोघांचा मृत्यू





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विजापूर रोडवरील हत्तूर परिसरात पहाटे झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रहमान मौला ढवळगी (वय 48) आणि राजू इमामसाब शेख (वय 35) हे पहाटे सुमारे 3 वाजण्याच्या सुमारास हत्तूर येथून सलगर वस्तीच्या दिशेने दुचाकीवरून जात होते. यावेळी समोरून येणाऱ्या मालवाहू ट्रक (क्र. MH 13 EP 2340) ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या दुसऱ्या व्यक्तीला उपचारासाठी शासकीय छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचाही मृत्यू झाला.

या दुर्दैवी घटनेची नोंद संबंधित पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

**जाहिर पब्लिकेशन** योजना अर्ज कमांक ६१५/२०२६ कलम ५०अ (१)

**सोलापूर येथील मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सोलापूर यांच्या न्यायालयात**

१) श्री विष्णु बाबुराव ताड
२) श्री मच्छिंद्र गणपत गायकवाड } अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही }सामनेवाला

सदरकामी अर्जदार यांनी श्री महालक्ष्मी मंदिर टाकळी ता पंढरपूर जि सोलापूर. नोंदणी क्रमांक ए-११७१ (सोलापूर) या न्यासाच्या संदर्भात मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० ( अ ) (१) अन्वये संस्थेच्या योजना अर्ज या कार्यालयात दाखल केलेले आहे. सबब नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, या न्यासाचे आपले काहीही संबंध असल्यास कोणतेही हरकत/तक्रार नोंद करावयाची असल्यास आपण स्वतः किंवा वकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी. ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही आणि एकतर्फ हुकम करून सदरचे प्रकरण निखाली काढण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सोलापूर, यांच्या शिक्यानिशी आज दिनांक ०२/०६/२०२६ रोजी दिली.

(टीप. सदरील नोटीस प्रसिध्द करण्याचा खर्च न्यासाच्या अर्जदार यांच्यावरती राहील.)

(शिक्का) सही/- सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर

**जाहिर प्रसिध्दीकरण** कि.अर्ज.नं.२५०/२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

साजिद आयुब बागवान,वय-३२ वर्षे, धंदा-व्यापार, रा. साठे नगर, मोहोळ, ता. मोहोळ,जि. सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. }सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार साजिद आयुब बागवान यांचा जन्म ता. १०/०२/१९९३ रोजी मोहोळ,ता.मोहोळ येथे झालेला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार साजिद आयुब बागवान यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद मोहोळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि. १७/०६/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असेता. ०२/०६/२०२६

(शिक्का) सही/- तहसिलदार,मोहोळ.

# साहित्य हे संवेदना जागृत करणारे प्रभावी माध्यम- प्रा. डॉ. वामन जाधव

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** साहित्य हे केवळ शब्दांचे संकलन नसून ते माणसाच्या अंतर्मनातील संवेदना जागृत करणारे आणि समाजाला विचारप्रवृत्त करणारे प्रभावी माध्यम आहे. साहित्यामुळे माणसामध्ये विचारांची परिपक्वता निर्माण होते, समाजातील दुःख, वेदना, संघर्ष आणि आनंद यांची जाणीव अधिक तीव्रतेने होते. माणुसकीची जपणूक, सामाजिक बांधिलकी आणि मूल्यांची रुजवण साहित्याच्या माध्यमातून घडते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक तथा विचारवंत प्रा. डॉ. वामन जाधव यांनी केले.

वेळापूर येथील इंद्रनील मंगल कार्यालयात प्रा. डॉ. भारत गायकवाड यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त आणि त्यांच्या 'अंतरीचे शब्दतरंग' या नव्या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम अत्यंत उत्साही, साहित्यिक आणि भावनाप्रधान वातावरणात संपन्न झाला. साहित्य, संस्कृती आणि वैचारिक चिंतनाचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर, साहित्यिक, शिक्षक, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते आणि रसिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक प्रा. डॉ. वामन जाधव होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी साहित्याची समाजपरिवर्तनातील भूमिका अधोरेखित करताना, लेखकाने समाजातील वास्तव, मानवी भावना आणि मूल्यांचा सातत्याने वेध घेत राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. भारत गायकवाड यांचे साहित्य हे संवेदनशील मनाचे प्रतिबिंब असून त्यांच्या लेखणीतून समाजमनाचे विविध पैलू प्रभावीपणे व्यक्त झाले असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

या कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश जडे, ज्येष्ठ साहित्यिक हनुमंत पवार, डॉ. पांडुरंग नलवडे, प्रा. अशोक गायकवाड, दादासाहेब खरात, प्रा. डॉ. गोरख साठे, प्रा. डॉ. औदुंबर जाधव, प्रा. शिवाजीराव वाघमारे, रवी वसंत सोनार, प्रा. सुरेखा भालेराव,माजी प्राचार्य जे जे जाधव,माजी जिल्हा परिषद सदस्य सतीशराव माने-देशमुख, युवा नेते जीवन जानकर, आंबेडकरी चळवळीचे नेते विकास धाईंजे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून प्रा. डॉ. भारत गायकवाड यांच्या दीर्घ साहित्यिक प्रवासाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. ग्रामीण जीवन, मानवी भावना, सामाजिक वास्तव आणि वैचारिक संवेदनशीलता यांचा वेध घेणाऱ्या त्यांच्या साहित्यनिर्मितीचे विशेष कौतुक करण्यात आले. 'अंतरीचे शब्दतरंग' हा काव्यसंग्रह



वाचकांच्या मनाला स्पर्श करणारा आणि विचारांच्या नव्या क्षितिजांकडे नेणारा ठरेल, असा विश्वासही अनेक वक्त्यांनी व्यक्त केला.

प्रा. डॉ. भारत गायकवाड यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते 'अंतरीचे शब्दतरंग' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न झाले. पुस्तक प्रकाशनाचा क्षण उपस्थित साहित्यप्रेमींसाठी संस्मरणीय ठरला.

यावेळी आपल्या मनोगतात प्रा. डॉ. भारत गायकवाड यांनी कुटुंबीय, मित्रपरिवार, साहित्यप्रेमी आणि सहकाऱ्यांचे ऋण व्यक्त केले. 'माझ्या साहित्यप्रवासात कुटुंबाची साथ, मित्रांचे प्रोत्साहन आणि वाचकांचे प्रेम हेच माझे खरे बळ राहिले आहे. या सर्वांच्या पाठिंब्यामुळेच 'अंतरीचे शब्दतरंग' हा काव्यसंग्रह आज वाचकांसमोर सादर करू शकलो,' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमास वेळापूर परिसरातील साहित्यप्रेमी, शिक्षक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जाहिर प्रसिध्दीकरण** अर्ज क्र.३०२/२०२६

**मोहोळ येथील मा.तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात**

कविता बाळु जाधव } अर्जदार

विरूध्द

मुख्य कार्यकारी अधिकारी,मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

याअर्थी अर्जदाराची मुलगी- सोनाली बाळु जाधव हिचा जन्म दि.०४/०३/१९९४ रोजी झाला आहे. तिच्या जन्माची नोंद मोहोळ येथील नगरपरिषद कार्यालयामध्ये जन्म तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणिव अर्जदारास नव्हती. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश मोहोळ नगरपरिषद मोहोळ यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सोनाली बाळु जाधव हिचा जन्म दि. ०४/०३/१९९४ रोजी झाल्यामुळे तिच्या जन्माची नोंद मोहोळ नगरपरिषदेचे रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/ हरकत स्वतः अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून मुख्य कार्यकारी अधिकारी नगर परिषद मोहोळ यांना सोनाली बाळु जाधव हिचा जन्म दि. ०४/०३/१९९४ रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दि.०२/०६/२०२६

लिपीक (शिक्का) सही/- तहसिलदार,मोहोळ,जि.सोलापूर.

**जाहिर प्रसिध्दीकरण** कि.अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

श्री. खेलु एकनाथ हेळकर,वय-५७ वर्षे,धंदा-गटई कामगार, रा. डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. हल्ली रा. समर्थ नगर, रुम नं.८४, वैष्णवी देवी मंदिर जवळ, घनसोली गांव, नवी मुंबई. ४००७०१ } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत डिकसळ, ता. मोहोळ, जि.सोलापूर. (अर्जाची नोटीस ग्रामसेवक, ग्रामपंचायत डिकसळ, यांचेवर बजावविण्यात यावी.) }सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार खेलु एकनाथ हेळकर यांचा जन्म ता. २४/१०/१९६८ रोजी डिकसळ, ता. मोहोळ येथे झालेला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार खेलु एकनाथ हेळकर यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि.१७/०६/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता.०२/०६/२०२६

(शिक्का) सही/- तहसिलदार,मोहोळ.

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने** मो. 9353370779

**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | | ८ |
| ९ | | ■ | १० | | | ■ | | ■ | | ■ | |
| | ■ | ११ | ■ | ■ | १२ | १३ | ■ | १४ | | १५ | |
| १६ | १७ | | १८ | ■ | ■ | १९ | | | ■ | | ■ |
| २० | | ■ | २१ | | २२ | | ■ | २३ | २४ | ■ | २५ |
| ■ | २६ | | | ■ | | ■ | २७ | | | २८ | |
| २९ | | ■ | | ■ | ३० | ३१ | | ■ | ३२ | | ■ |
| | ■ | ३३ | | | ■ | ३४ | | ३५ | | ■ | ३६ |
| ३७ | | | | ■ | ३८ | | ■ | | ■ | ३९ | |
| ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | ४० | | ४१ | | ■ |
| ४२ | ४३ | | ■ | ४४ | | | | ■ | ४५ | | ४६ |
| ४७ | | ■ | ४८ | | | ■ | ■ | ■ | | ■ | |

**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उष:काल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

## सुडोकु - 267

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 2 | 6 | | 1 | | | | 5 |
| | | | 3 | 9 | | | | |
| | 7 | | 2 | 6 | | 8 | | 1 |
| | 9 | 7 | | | | | | |
| 3 | | 2 | 9 | 5 | 1 | 6 | | 7 |
| | 6 | | | | | | 1 | |
| 2 | 1 | | 7 | | 6 | 5 | 3 | 8 |
| | 8 | | | 2 | | 4 | | 9 |
| | | | 5 | | 9 | 1 | 6 | |

# राजाभाऊ आलुरे यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश निश्चित?

## सोलापूरच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जनता पक्षाचे आमदार विजयकुमार देशमुख यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळख असलेले राजाभाऊ आलुरे हे लवकरच शिवसेना (एकनाथ शिंदे गट) मध्ये प्रवेश करणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात असून, या घडामोडीमुळे सोलापूरच्या राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे.

विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख तथा खासदार धैर्यशील माने यांच्या कोल्हापूर येथील निवासस्थानी राजाभाऊ आलुरे यांनी आपल्या समर्थकांसह भेट घेतली. या भेटीदरम्यान आगामी राजकीय वाटचाल, सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक आणि स्थानिक राजकीय समीकरणांबाबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे.

राजाभाऊ आलुरे हे गेल्या अनेक वर्षांपासून आमदार विजयकुमार देशमुख यांचे विश्वासू आणि सक्रिय कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत. शहराच्या पश्चिम भागात त्यांचा स्वतंत्र जनसंपर्क असून विविध सामाजिक आणि स्थानिक प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे. त्यामुळे त्यांच्या राजकीय निर्णयाकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे, २०२६ च्या सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत राजाभाऊ आलुरे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविली होती. अत्यंत मर्यादित पक्षीय पाठबळ असतानाही त्यांनी सुमारे ५ हजार ३०० मते मिळवून आपली स्वतंत्र राजकीय ताकद सिद्ध केली होती. या मताधिक्यामुळे स्थानिक राजकारणात त्यांचे वजन वाढले असून विविध राजकीय पक्ष त्यांच्याकडे संभाव्य नेतृत्व म्हणून पाहत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना राज्यभर संघटन विस्तारावर भर देत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभावी कार्यकर्ते आणि स्थानिक पातळीवर जनाधार असलेल्या नेत्यांना पक्षात सामावून घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशा परिस्थितीत राजाभाऊ आलूरे यांचा प्रवेश शिवसेनेसाठी सोलापूर शहरात राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरू शकतो, असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

आलुरे यांच्या प्रवेशामुळे सोलापूर महानगरपालिका निवडणुकीपूर्वी शहरातील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः भाजप, शिवसेना आणि इतर स्थानिक राजकीय गटांमधील ताकदीचे संतुलन नव्याने निर्माण होऊ शकते. शहर उत्तर सोलापूर परिसरातील त्यांचा प्रभाव लक्षात घेता शिवसेनेला संघटनात्मक बळ मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

तथापि, राजाभाऊ आलुरे यांच्या पक्षप्रवेशाबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसली तरी येत्या काही दिवसांत शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा पार पडण्याची शक्यता राजकीय वतुर्ळातून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सोलापूरच्या राजकारणात पुढील काही दिवसांत घडणाऱ्या घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

# १२ गावांतील नागरिकांना लवकरच मिळणार प्रॉपर्टी कार्ड

## नगरभूमापन मालमत्ता हक्कांना अधिकृत स्वरूप देणारी मोहीम- महापौर कोंड्याल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या १२ गावांतील नागरिकांना मालमत्ता पत्रक (प्रॉपर्टी कार्ड) उपलब्ध करून देण्यासाठी सुरू असलेल्या नगरभूमापन मोहिमेच्या कामाचा आढावा बुधवारी महापालिकेच्या कौन्सिल हॉलमध्ये घेण्यात आला.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अधीक्षक भूमी अभिलेख दादासाहेब घोडके, उपअधीक्षक सचिन पवार, मॅपेक्स एजन्सीचे प्रतिनिधी सचिन कांबळे, सहायक संचालक नगर रचना समीर शितोळे, कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती, उपअभियंता आनंद जोशी यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते.

बैठकीत नगरभूमापन प्रक्रियेचे सादरीकरण करण्यात आले. उपअधीक्षक सचिन पवार यांनी सर्वेक्षणाची उद्दिष्टे, नागरिकांना होणारे फायदे, आवश्यक कागदपत्रे आणि पुढील कार्यपद्धती याबाबत माहिती दिली. सर्वेक्षणातून तयार होणाऱ्या डिजिटल नकाशांमुळे नागरिकांना ऑनलाइन प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध होणार असून मालमत्तेसंबंधी वाद कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच प्रॉपर्टी कार्ड व सनद मिळाल्यानंतर बँक कर्ज, आर्थिक व्यवहार आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे.

यावेळी महापौर कोंड्याल यांनी नगरसेवकांनी नागरिक आणि नगरभूमापन कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय साधून मोहीम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच काम विहित कालमयार्देत पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळ वाढविण्याच्या सूचनाही दिल्या.

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी नगरभूमापन विभागाला महापालिकेच्या नगररचना व मालमत्ता विभागामार्फत समन्वय अधिकारी उपलब्ध करून दिले जातील, असे सांगत सर्वेक्षणाचे काम प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. यावेळी नगरसेवक प्रशांत पल्ली, शिवानंद पाटील, नारायण बनसोडे, अनंत जाधव, नगरसेविका अर्चना वडनाल यांनी देखील सूचना केल्या

या मोहिमेसाठी महापालिकेने यापूर्वीच ५ कोटी रुपयांचा निधी नगरभूमापन विभागाकडे वर्ग केला असून, अत्याधुनिक ड्रोन व जीआयएस तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सर्वेक्षणाचे काम सुरू आहे.

**आवश्यक कागदपत्रे**

नगरभूमापन मोहिमेसाठी ७/१२ उतारा, महापालिका कर पावती, खरेदीखत, सक्षम प्राधिकाऱ्यांचे आदेश, डिम्ड कन्व्हेयन्स, सोसायटी नोंदणी प्रमाणपत्र, मंजूर बांधकाम नकाशा, वारसा हक्क प्रमाणपत्र, वीज बिल, पाणीपट्टी व आधार कार्ड आदी कागदपत्रे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# मराठा आंदोलनातील मृतांच्या वारसांना MIDC मध्ये नोकरी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्युमुखी पडलेल्या आंदोलकांच्या कुटुंबीयांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. आंदोलनातील मृतांच्या कुटुंबातील एका अवलंबितास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) मध्ये अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी ही कार्यवाही सुरू केली आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना संबंधित वारसांची तातडीने पडताळणी करून अधिकृत प्रमाणपत्र देण्याचे निर्देश दिले आहेत.

या निर्णयामुळे आंदोलनात कुटुंबातील सदस्य गमावलेल्या अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळणार असून त्यांच्या पुनर्वसनाचा मार्गही सुकर होणार आहे. मराठा समाजाच्या भावना, संघर्ष आणि त्यागाचा सन्मान राखत सरकारने केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृतीतून दिलेला शब्द पाळल्याचे या निर्णयातून दिसून येत आहे.

मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणारा हा निर्णय असल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. सरकार आंदोलनातील मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदनशील असून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही या निर्णयातून स्पष्ट झाले आहे.

# टपाल विभागाच्या निवृत्ती वेतनधारकांसाठी 12 जुनला पेन्शन अदालत

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- टपाल विभागाच्या निवृत्ती वेतनधारकांसाठी व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांसाठी पंढरपूर येथे पोस्टल पेन्शन अदालतीचे दि. 12 जुनला सकाळी 11.00 वाजता अधीक्षक डाकघर यांचे कार्यालय, पंढरपूर विभाग, पंढरपूर येथे आयोजन करण्यात आले आहे. निवृत्तवेतनधारकांच्या लाभाशी संबंधीत तक्रारी, जे टपालविभागातून निवृत्त झाले आहेत व ज्यांचा सेवेत असताना मृत्यु झालेला आहे, पंढरपूर टपाल विभागामधील निवृत्तीधारकांचे तीन महिन्यांच्या आत निपटान झालेले नाही अशा प्रकरणांचा डाक पेन्शन अदालत मध्ये विचार केला जाईल. पेन्शन अदालतमध्ये पूर्णपणे कायदेशीर मुद्द्यासह प्रकरणे, ई. वारसा प्रमाणपत्र, कल्पित पेन्शन, टीबीओपी/एमएसीपी पदोन्नती, वेतनश्रेणी वाढविणे , अशा प्रकारणांचा डाक पेन्शन अदालतमध्ये विचार केला जाईल. तसेच धोरणात्मक बार्बीसह शिस्तभंगाच्या आणि डी. पी. सी. च्या पुनरवलोकनासाठी प्रलंबित प्रकरणांचा विचार केला जाणार नाही.

निवृत्ती वेतनधारकांनी आपले अर्ज मुन्ना कुमार, अधीक्षक डाकघर, पंढरपूर विभाग 413304 येथे दि. 05 जुन 2026 रोजी पर्यंत पाठवावेत. नंतर मिळालेल्या अर्जावर पेन्शन अदालत मध्ये विचार करण्यात येणार नाही. अधीक्षक डाकघर, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांनी कळविले आहे.

# लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून 'पोषणाचे महत्त्व' जनजागृती कार्यक्रम



**धाराशिव (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संस्था व विकास प्रतिष्ठान अंतर्गत संचालित लोकमंगल नर्सिंग कॉलेज, वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील विद्यार्थ्यांनी काटी गावात 'समृद्ध गाव योजना' अंतर्गत "Importance of Nutrition (पोषणाचे महत्त्व)' या विषयावर आरोग्य शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले.

या कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये संतुलित आहार, पोषण आणि निरोगी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी गावातील प्रत्येक घरी जाऊन नागरिकांना कार्यक्रमासाठी निमंत्रित केले तसेच पोषणयुक्त आहाराचे महत्त्व समजावून सांगितले. त्यानंतर गावाच्या मुख्य चौकात रॅली काढून घोषणाबाजी (स्लोगन) करत जनजागृती करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी संतुलित आहार, फळे, भाज्या, कडधान्ये, दुग्धजन्य पदार्थ यांचे आरोग्यासाठी असलेले महत्त्व, कुपोषणाचे दुष्परिणाम तसेच योग्य आहारामुळे होणारे आरोग्यदायी फायदे याबाबत सविस्तर माहिती दिली. पोषणाविषयी जनजागृती ही निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमास लोकमंगल नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बिरादार, इनामदार सर, फौजिया मुल्ला मॅडम, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या सामाजिक व आरोग्यविषयक जनजागृती उपक्रमाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य व पोषणविषयक माहिती पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# पायरीपूल-तांबवे येथे मुलींची वारकरी शिक्षण संस्थेचे उद्घाटन संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्याच्या पूर्व भागातील अकलूज टेंभुर्णी रोडवरील पायरी पूल-तांबवे (ता.माळशिरस) येथील श्री क्षेत्र दत्तवाडी येथे अनुसया माता मुलींची वारकरी शिक्षण संस्था या नूतन शिक्षण संस्थेचे उद्घाटन माजी सहकार मंत्री व दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख व श्रीमती स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांचे हस्ते रविवारी दुपारी उत्साहात करण्यात आले.

अधिकमास पौर्णिमेच्या निमित्ताने श्री एकमुखी दत्त मंदिर पायरीपूल येथे रविवारी सकाळी एक दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या किर्तन महोत्सवाचे औचित्य साधून या शिक्षण संस्थेचे व मुलींचे बालसंस्कार वर्ग प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ह.भ.प सागर महाराज बोराटे यांनी उपस्थित भक्तांना मार्गदर्शन केले. तसेच आमदार सुभाष देशमुख व श्रीमती स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.


कीर्तनाच्या कार्यक्रमानंतर मिटकलवाडीचे भीमराव रामचंद्र लोकरे यांनी महाप्रसाद अन्नदान सेवा केली. या कार्यक्रम स्थळी बापूसाहेब देहुकर महाराज यांनीही भेट दिली. त्याचप्रमाणे अनुसया माता मुलींची वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने सोमवार दि.१ जून ते शुक्रवार दि.१२ जून पर्यंत मुलींचे बालसंस्कार वर्ग प्रशिक्षण शिबिर व पाच दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

उद्घाटन कार्यक्रम व किर्तन महोत्सवाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिर समितीचे विश्वस्त अभिमन्यू साळुंखे, शिक्षण संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष पुनमताई साळुंखे, मंदिर समितीचे संचालक बापू तात्या मुंडफणे, मुरारजी इनामदार,महादेव चव्हाण, संभाजी घोंगाणे-जाधव, दत्तात्रय घोंगाणे-जाधव, दादासाहेब जाधव, दादासाहेब वाघ, सचिन माळी, अशोक गायकवाड, तुकाराम पाटोळे, तुकाराम जाधव, नवगिरे, सुमंत काका कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले.

बाल संस्कार वर्ग प्रशिक्षण शिबिरात मुलींनी सहभाग घ्यावा असे आवाहन अनुसया माता मुलींची वारकरी शिक्षण संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा ह.भ.प पूनम ताई साळुंखे यांनी केले आहे.

# करमाळा तालुक्याच्या पश्चिम भागात वादळाचा तडाखा

## केळी पिकांचे मोठे नुकसान, वृद्ध दाम्पत्याचा मृत्यू



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्याच्या पश्चिम भागात शनिवारी (३१ मे) रात्री साडेआठच्या सुमारास आलेल्या भीषण वादळी वाऱ्याने मोठा हाहाकार माजविला. या वादळामुळे भगतवाडी, गुलमोहरवाडी, पोमलवाडी, खातगाव, केत्तूर, पारेवाडी व परिसरातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर केळी पिकांचे नुकसान झाले असून सुमारे १५० एकर क्षेत्र बाधित झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. काही ठिकाणी केळीची बाग पूर्णपणे जमीनदोस्त झाल्याचे चित्र दिसून आले.

माळशिकारे या शेतकऱ्यांच्या केळी पिकाचा दर निश्चित झाला होता आणि दुसऱ्याच दिवशी काढणी होणार होती. मात्र, अचानक आलेल्या वादळामुळे त्यांच्या लाखो रुपयांच्या उत्पन्नावर पाणी फिरले. अशा प्रकारे अनेक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

दरम्यान, या वादळात पोमलवाडी येथील वृद्ध दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. जगन्नाथ मारुती नवले (वय ७०) आणि शालन मारुती नवले (वय ६५) हे पती-पत्नी शेतात बांधलेल्या घरात राहत होते. वादळ सुरू होण्यापूर्वी दोघेही घरात जेवणासाठी बसले असताना जोरदार वाऱ्यामुळे घराची भिंत त्यांच्या अंगावर कोसळली. भिंतीखाली दबून दोघांचाही जागीच मृत्यू झाला.

रात्री उशिरापर्यंत नातेवाईकांकडून संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र प्रतिसाद मिळाला नाही. रविवारी सकाळी नातेवाईक शेतातील घरी पोहोचले असता, पडलेल्या भिंतीखाली दबलेल्या अवस्थेत दोघांचे मृतदेह आढळून आले. त्यानंतर प्रशासनाला माहिती देण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच तहसील प्रशासनाने महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठवून पंचनामा सुरू केला. तसेच मृत दाम्पत्याच्या शवविच्छेदनासाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली. कृषी व महसूल विभागाकडून पीक नुकसानीचे तसेच जीवितहानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण करमाळा तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

"वादळामुळे झालेली पीकहानी व जीवितहानी अत्यंत दुर्दैवी आहे. माहिती मिळताच महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी पाठविण्यात आले. मयतांच्या कुटुंबीयांना तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत लवकर मिळावी यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. नागरिकांनी वादळी वारे व अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती खबरदारी घ्यावी."

**– शिल्पा ठोकडे**

(तहसीलदार, करमाळा)

"करमाळा तालुक्यातील पश्चिम भागात झालेले पीक नुकसान व जीवितहानी गंभीर बाब आहे. नुकसानग्रस्त शेतकरी आणि मयतांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत मिळावी यासाठी तहसील प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत."

**– आ. नारायण पाटील**

# दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा त्यांचा हक्कच - दिव्यांग आयुक्त बडे



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम 2016 नुसार दिव्यांग समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले काम म्हणजे त्यांच्यावरील कृपादृष्टी नसून तो त्यांचा हक्क आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागानी दिव्यांगासाठी असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून एकही दिव्यांग व्यक्ती शासकीय योजना पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश दिव्यांग सक्षमीकरण आयुक्त सत्यजित बडे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित दिव्यांग व्यक्ती कल्याण व पुनर्वसन समितीच्या आढावा बैठकीत बडे बोलत होते. यावेळी उप आयुक्त श्रीमती एच. एस. गाढे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त श्रीमती सुलभा वटारे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखर्डे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. मोहन शेगर, जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका योगेश डोके यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

दिव्यांग आयुक्त बडे पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील सर्व संबंधित शासकीय विभागांनी दिव्यांग व्यक्तींना मोठ्या प्रमाणावर शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला पाहिजे, त्यासाठी स्वतःहून पुढाकार घ्यावा व काटेकोर नियोजन करावे. जिल्ह्यात दिव्यांगासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था व संघटना यांच्यात समन्वय ठेवावा. दिव्यांगाना योजनाचा लाभ देऊन त्यांच्या तक्रारी येणार नाहीत या दृष्टीने प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हा नियोजन समितीच्या सर्वसाधारण योजनेअंतर्गत च्या एकूण निधीच्या 1% निधी दिव्यांग कल्याणासाठी ठेवणे अनिवार्य आहे. हा निधी खर्च करताना ग्रामविकास विभागाच्या 25 जून 2018 च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच ग्रामविकास विभाग आणि नगर विकास विभागाने त्यांच्या मंजूर निधीच्या 5 टक्के निधी दिव्यांग योजनांसाठी राखीव ठेवावा, असे निर्देश दिव्यांग आयुक्त श्री. बडे यांनी देऊन सर्व बँकांनी दिव्यांगासाठी आलेली कर्ज प्रकरणे त्वरित मंजूर करावीत तसेच प्रत्येक बँकांना जास्तीत जास्त दिव्यांगाची प्रकरणे मंजूर करण्यासाठी उद्दिष्ट ठरवून द्यावे, असेही त्यांनी सूचत केले.

ग्रामपंचायत विभागातील 1,026 ग्रामपंचायत अंतर्गत सन 2025 26 मध्ये पाच टक्के प्रमाणे दिव्यांगासाठी 2 कोटी 74 लाखाच्या निधी ठेवून 2.61 कोटी निधी खर्च केलेला आहे. तसेच जिल्ह्यातील सतरा नगरपालिका अंतर्गत 2589 असून त्यांच्यावर प्रतिवर्षी एक कोटी 14 लाखाचा खर्च करून विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात आलेला आहे. परंतु हा दिलेला लाभ कमी प्रमाणात असून ग्रामविकास व नगर विकास विभागाने आणखी मोठ्या प्रमाणावर दिव्यांगाना वैयक्तिक व सामूहिक योजनांचा लाभ मिळविण्यासाठी नियोजन करावे अशा सूचना बडे यांनी दिल्या. तसेच लातूर जिल्ह्यात दिव्यांगासाठी दोन सेंसरी पार्क उभारलेल्या असून सोलापूर जिल्ह्यात ही सेंसरी पार्क उभारण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सुचित केले.

यावेळी दिव्यांग बडे यांनी दिव्यांग सक्षमीकरण विभाग, नियोजन विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, नगर विकास, बांधकाम विभाग जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, जिल्हा अग्रणी बँक आणि दिव्यांग वित्त व विकास महामंडळ यांनी दिव्यांगासाठी केलेल्या कामाचा सविस्तर आढावा घेऊन जिल्ह्यात आणखी मोठ्या प्रमाणावर काम करून दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना दिल्या.

प्रारंभी सहाय्यक आयुक्त श्रीमती वटारे यांनी प्रास्ताविक करून जिल्ह्यात विविध शासकीय यंत्रणांकडून सुरू असलेल्या कामांची माहिती दिली. तसेच जिल्ह्यातील सर्व दिव्यांगापर्यंत शासनाच्या योजनेचा लाभ पोहोचवण्यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

# दत्तकला शिक्षण संस्थेत 3 जून रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा बुधवार, दि. ३ जून २०२६ रोजी दत्तकला कॉलेज ऑफ फार्मसी, स्वामी चिंचोली (ता. दौंड, जि. पुणे) येथे आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे आणि दत्तकला शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा मेळावा होणार आहे. फार्मसी व लाईफ सायन्स क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी आणि नोकरीच्या शोधात असलेल्या उमेदवारांसाठी ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे. या मेळाव्यात सोहन हेल्थकेअर, क्लीन सायन्स अँड टेक्नोलॉजी, ओमनी ॲक्टिव्ह इंडिया, एमक्युअर फार्मा, जिनेव्हा बायोफार्मा आदी नामांकित कंपन्या सहभागी होणार असून सुमारे १९८ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

१० वी, १२ वी, डी.फार्म, बी.फार्म, बीएससी केमेस्ट्री, एमएससी केमेस्ट्री तसेच एमएससी बायोटेक्नॉलॉजी पात्रताधारक उमेदवारांना या मेळाव्यात सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या प्रती व बायोडाटा सोबत घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक प्रा. रामदास झोळ यांनी पुणे, सोलापूर व नगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.